# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि.
ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्र-३३३/२०२४ दिनांक-२७/०८/२०२४.

## “जमिनीचे खेटे दस्ताऐवज करुन जमिन विक्री करणाऱ्या ईसमास भाईंदर पोलीस ठाणे यांनी केली अटक”

फिर्यादी श्री. दिपक शशिकांत शहा, व्यवसाय-व्यापार, रा. नं. १४२, ΙΙ मेन रोड, आरएमव्ही. ΙΙ स्टेज, एअरफोर्स समोर, बॅग्लोर, कर्नाटक यांचे फिर्यादीवरुन भाईंदर पोलीस ठाणे गुरनं. Ι १२७/२०२४ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, १२० (ब), ३४ गुन्हा दिनांक२०/०३/२०२४ रोजी दाखल आहे.

नमुद गुन्हयातील जमीन मालक व फिर्यादी यांचे काका कै. प्रविण हरगोविंदास शहा यांचे दि. १०/४/१९९८ रोजी सेलम, तामीळनाडु येथे निधन झालेले आहे, त्यांच्या मालकीची मौजे भाईंदर नविन सर्वे नंबर ३४३/२ ही १६१८.८७ स्क्वेअर मी. इतकी जमिन आहे. फिर्यादी व त्यांचे नातेवाईक हे व्यवसाय व नोकरी निमीत्त बाहेरगावी राहत असल्याने त्यांना जमिनीकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. या गोष्टीचा फायदा घेत पाहीजे आरोपी पेशइमाम मोहंमद अब्दुल रऊफ याने तोतया प्रविण हर गोविंददास शहा नावाचा इसम तयार करुन, त्याचे नावचे आधारकार्ड, पॅनकार्ड बनवुन, नमुद जमिनीचे ते एकटेच वारस असल्याचे दर्शवुन इतर आरोपीतांशी संगणमत करुन, नमुद जमिनीचे बाजारमुल्य २,२७,८५,५८२.९६ इतके असुन, सदरचा व्यवहार हा फक्त ५,५१,०००/- रुपये रजिस्टरदस्त बनवुन विक्री केली आहे. नमुद गुन्हयात (१) तोतया प्रविण हर गोविंददास शहा रा. बहारपाडा, मदीना मस्जिदचेमागे, अमरेली, गुजरात, (२) पेशइमाम मोहंमद अब्दुल रऊफ, रा. ०३, गोम्स चाळ, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, डिमेलो कम्पाऊंड, प्रिती हॉटेलच्या बाजुला, कुर्ला पश्चिम, मुंबई. (३) देवेंद्र मणिलाल धासवाला, रा. २०१/६०२, शांती निकेशन, श्रीनगर कॉलीनी, एम.जी. रोड, जैन मंदिराचे जवळ, गोरेगाव पश्चिम, मुंबई (४) सुरेश जादवनकुम, रा. ए/२०२, शिवदर्शन टॉवर, अहिंसा मार्ग ऑफ लिंक रोड, चिंचोली बंदर, मालाड पश्चिम, मुंबई ४०००६४ असे आरोपी आहेत.

नमुद गुन्हयातील आरोपी तोतया प्रविण हरगोविंददास शहा याचे खरे नाव व पत्ता याची काहिही माहिती नसतांनात्याचा मागील ७ महिन्यापासुन मिरारोड, मुंबई, अमरेली-गुजरात येथे शोध घेवुन, नमुद आरोपीताची बारकाईने माहिती काढुन, तांत्रीकतपास करुन, नमुद आरोपीताचे नाव चंद्रकांत प्रभुदास घेलाणी, रा. सी/२०४, श्री जी एनक्लेव, सोला भागवत, साईबाबा मंदीराचे जवळ, अहमदाबाद शहर, राज्य गुजरात असे निष्पन्न करुन, त्याचा पुर्ण नांव पत्ता अशी माहिती मिळविली व तदनंतर तपास पथक उपलब्ध पत्त्यावर सुचना देवुन पाठविले असता नमुद आरोपी मिळुन आला आहे.

नमुद आरोपीतास दिनांक २४/०८/२०२४ रोजी ११.३५ वाजता अटक केली असुन, त्यास मा. न्यायालयात हजर केले असता नमुद आरोपीताची दिनांक २८/०८/२०२४ पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. गुन्हयाचा पुढिल तपास भाईंदर पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विवेक सोनवणे करीत आहे. अशा रितीने तोतया आरोपीताची कोणतीही माहिती नसतांना त्याची माहिती मिळवुन त्यास गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कारवाई श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.आयुक्तालय, श्री. दत्तात्रय शिंदे अप्पर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.आयुक्तालय, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, श्रीमती दिपाली खन्ना, सहायक पोलीस आयुक्त याचे मार्गदर्शनाखाली व पोनि/विवेक सोनवणे, पोउनि/प्रसाद गोवले, सफौ/राजेश पानसरे, पोहवा/रविंद्र भालेराव, पोअं/गजानन चव्हाण, राहुल काटकर यांनी केली आहे.

--------oooo--------